आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२७ जुलै २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विकसित भारत हे प्रत्येक देशवासियांचं ध्येय असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं नीती आयोगाच्या बैठकीत प्रतिपादन

- नदीजोड प्रकल्प वेगाने हाती घेण्याच्या सूचना प्रधानमंत्र्यांनी या बैठकीत दिल्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधणार

- गाझामध्ये इस्राएलच्या हल्ल्यात शाळेत आश्रय घेतलेले ३० पॅलेस्टिनी ठार, १०० हून अधिक जण जखमी

**आणि**

- पॅरिस ऑलिंपिकमध्ये नेमबाज मनू भाकर महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात अंतिम फेरीत

**<><><><><>**

विकसित भारत २०४७ हे प्रत्येक भारतीयाचं ध्येय असून ते साध्य करण्यासाठी राज्य सरकारं महत्वाची भूमिका पार पाडू शकतात, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी दिल्लीत नीती आयोगाच्या ९ व्या बैठकीत ते आज बोलत होते. हे दशक तांत्रिक, भौगोलिक, राजकीय बदलाचं तसचं नवी संधी उपलब्ध करणारं असल्याचंही त्यांनी सांगितलं. भारतानं या संधीचा वापर करुन आंतरराष्ट्रीय स्तरावरील गुंतवणूक वाढवायला हवी असंही ते म्हणाले. या वर्षीच्या बैठकीचं घोषवाक्य 'विकसित भारत २०४७' असून त्याच्या ध्येय धोरणांच्या

मसुद्यासाठी या बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सर्व राज्यांचे मुख्यमंत्री त्याचप्रमाणे केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल, विशेष निमंत्रित आणि नीती आयोगाचे उपाध्यक्ष तसेच सदस्य उपस्थित आहेत.

**<><><><><>**

कोकणातलं वाया जाणारं पाणी दुष्काळग्रस्त मराठवाड्याकडे वळवणे, नदीजोड प्रकल्पाला वेग देणं या महत्वाच्या विषयांसह दुध, कापूस, सोयाबीन, कांदा यासंदर्भात शेतकऱ्यांच्या मागण्यांचा विचार करून त्यांना न्याय मिळावा, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज निती आयोगाच्या बैठकीत बोलतांना केली. नदीजोड प्रकल्पाला वेग द्यायच्या सूचना प्रधानमंत्र्यांनी दिल्याचं ते यावेळी म्हणाले. कांद्याच्या किमती स्थिरीकरण निधी योजनेंतर्गत बफर स्टॉकसाठी कांदा खरेदी करण्यासंदर्भातील किंमत धोरणावर विचार करण्याची विनंती प्रधानमंत्र्यांना केली. सोयाबीन आणि कापसाचा हमी भाव वाढवून मिळावा. हंगामाच्या सुरुवातीपासूनच सोयाबीनला हमीभावापेक्षा कमी दर मिळाल्यानं शेतकऱ्यांना नुकसान सोसावे लागले. शेतकऱ्यांना प्रधानमंत्री न्याय देऊ शकतात त्यामुळे लवकरच यावर तोडगा निघेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थसंकल्पात घोषणा केलेल्या १२ पैकी सर्वात मोठा औद्योगिक पार्क राज्यात रायगड जिल्ह्यातल्या दिघीमध्ये होणार आहे. यासाठी गुंतवणूकदारांकडून सर्वाधिक विचारणा होत असल्याची माहिती केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज मुंबईत दिली. केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत ते मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षात ५ कोटींहून अधिक आयकर विवरणपत्र दाखल करण्यात आले आहेत. गेल्यावर्षाच्या तुलनेत यात ८ टक्क्यांनी वाढ झाली असून काल एका दिवसात २८ लाखांहून अधिक जणांना आयकर परतावा मिळाला आहे, असंही आयकर खात्यानं सांगितलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी ११ वाजता मन की बात या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११२वा, भाग आहे. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व केंद्रांवरून, तसंच newsonair.gov.in हे संकेतस्थळ आणि न्यूज ऑन एआयआर या मोबाइल ॲपवरून थेट प्रक्षेपित केला जाईल. आकाशवाणी, दूरदर्शन, प्रधानमंत्री कार्यालय आणि माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनल्सवरूनही कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण आपण ऐकू शकाल.

<><><><><>

सांगलीतल्या पूरग्रस्तांच्या बचाव कार्यासाठी लष्करानं पथक पाठवलं आहे. यामध्ये अभियंता कृती दल, पायदळ आणि वैद्यकीय पथकातल्या सुमारे शंभर जवानांचा समावेश आहे.

<><><><><>

देशातल्या मत्स्यव्यवसाय संशोधन संस्थेनं समुद्री कासवे वगळता येतील अशा पद्धतीची विशेष जाळी विकसित केली असून त्याची परिणामकारकता जाणवणारे प्रात्यक्षिक लवकरच दाखवले जाईल, असं मत्स्यव्यवसाय, पशुपालन आणि

दुग्धव्यवसाय राज्यमंत्री जॉर्ज कुरियन यांनी सांगितलं आहे.  ते आज कोची इथं माध्यमांशी बोलत होते.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधल्या अनंतनाग जिल्ह्यात आज रस्ते अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला. यात एका पोलिसासह पाच बालकं आणि दोन महिलांचा समावेश आहे. किश्तवार-सिंथन रस्त्यावर अर्शन दकसुम जवळ हा अपघात झाल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

काश्मिर खोऱ्यातल्या कुपवाडा जिल्ह्याच्या माच्चल भागात झालेल्या चकमकीत सुरक्षा दलानं एका पाकिस्तानी नागरिकाचा खात्मा केला. काश्मिर खोऱ्यातल्या वाईट हवामानाचा आणि कमी दृश्यमानतेचा फायदा घेत दोन ते तीन दहशतवादी खोऱ्यात घुसले होते. त्यांनी सुरक्षा दलावर जवळून गोळीबार सुुरु केला. त्यावर सुरक्षा दलानं दिलेल्या प्रत्युत्तरात एकजण ठार झाला. यावेळी दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात दोन जवानही जखमी झाले असून त्यांना श्रीनगरच्या बेस कॅम्प मधील रुग्णालयात दाखल करण्यात आलं. उपचारादरम्यान एक जवान शहीद झाला आहे.

**<><><><><>**

गाझाच्या मध्यवर्ती भागात इस्राएलनं केलेल्या हल्ल्यात आज एका शाळेत आश्रय घेतलेले किमान ३० पॅलेस्टिनी नागरिक ठार झाले तर १०० हून अधिक जण जखमी झाले. मात्र, आपण शाळेच्या आवारात असलेल्या हमासच्या तळावर हल्ला केल्याचं इस्राएलच्या लष्करानं सांगितलं आहे. या शाळेच्या आश्रयानं शस्त्रास्त्रांचा

साठा केला जात असून इस्राएलच्या फौजांवर हल्ले चढवले जात असल्याचं इस्राएलच्या लष्करानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेत नेमबाज मनू भाकरने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात अंतिम फेरी गाठली आहे. मनु भाकरने पात्रता फेरीत ५८० गुण मिळवत तिसरं स्थान पटकावलं. **त**र रिदम सांगवानला १५ व्या स्थानावर समाधान मानावं लागलं. नेमबाजीच्या १० मीटर एअर रायफल मिश्र प्रकारात भारताचं आव्हान पात्रता फेरीत संपुष्टात आलं आहे. आज झालेल्या पात्रता फेरीच्या स्पर्धेत भारताचे संदीप सिंग आणि एलविन वलारिवान या जोडीला पात्रता फेरीत १२ व्या स्थानावर तर अर्जुन बबुता आणि रमिता जिंदाल या जोडीला ६ व्या क्रमांकावर समाधान मानावं लागलं. १० मीटर एअर पिस्तूल प्रकारात सरबज्योत सिंग नवव्या तर अर्जुनसिंग चीमा २२ व्या क्रमांकापर्यंत पोहचू शकले. पुरुषांच्या एकल नौकानयन स्पर्धेत, बलराज पन्वारने चौथ्या स्थानावर आपली शर्यत पूर्ण केली.

पुरुषांच्या एकल नौकानयन स्पर्धेत, बलराज पन्वारने चौथ्या स्थानावर आपली शर्यत पूर्ण केली. उद्या त्याला उपांत्यपूर्व फेरी गाठण्याची आणखी एक संधी मिळेल.

हॉकीमध्ये ब गटात भारतीय पुरुष संघाचा सामना आज न्यूझीलंडशी होणार आहे.

टेनिसमध्ये, रोहन बोपण्णा आणि श्रीराम बालाजी या भारतीय जोडीची पुरुष दुहेरीच्या पहिल्या फेरीसाठी लढत खराब हवामानामुळे वेळेत सुरू झाली नाही. तर बॅडमिंटनमध्ये, लक्ष्य सेनची पुरुष एकेरीच्या गटात, तर पुरुष दुहेरी गटात, भारताची अव्वल जोडी सात्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांची यांच्या लढती रात्री होणार आहेत. महिला दुहेरी गटात, अश्विनी पोनप्पा आणि तनिषा क्रास्टो या जोडीचाही सामना आज होणार आहे.

**<><><><>**

पॅरिस ऑलिंपिकमध्ये आज चीननं १० मीटर एअर रायफल मिश्र प्रकारात सुवर्णपदक पटकावलं. चीनच्या जोडीनं आपले प्रतिस्पर्धी दक्षिण कोरियाच्या जोडीचा १६ विरुद्ध १२ गुणांनी पराभव केला. त्याआधी, कझाकस्ताननं याच खेळात कांस्य पदक पटकावलं.

**<><><><>**

भारत आणि श्रीलंके दरम्यान तीन सामन्यांच्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामन्यात श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ ही मालिका खेळत आहे. सामन्याचं शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या १३ षटकांत २ बाद १४६ धावा झाल्या होत्या. सुर्यकुमार यादव यानं सामन्यात अर्धशतक केलं.

**<><><><>**

ॲक्ट ईस्ट धोरणाद्वारे भारत आशियाई एकता आणि केंद्रस्थान कायम राखेल, असं परराष्ट्र मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. आज चौदाव्या पूर्व आशिया शिखर परिषदेच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत बोलत होते. सीमा सुरक्षा सुनिश्चित करणं, देशांतर्गत गुन्हेगारी रोखणं, हिंसाचार कमी करणे आणि कनेक्टिव्हिटी प्रकल्पांना पुढे नेण्याकडे भारताचे लक्ष आहे. गाझामध्ये वाढ आणि संयम राखण्याचं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><>**

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी विशेष लोक अदालत सप्ताहामध्ये नागरिकांनी सहभागी व्हावे असं आवाहन केलं आहे. हा सप्ताह २९ जुलै ते ३ ऑगस्ट दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. दुर्गम भागात राहणाऱ्यांना

व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे यात सहभागी होता येईल, असं न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी सांगितले.

**//<><><><><>//**